पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे मुखपत्र

# कल्याणवार्ता

• वर्ष १ ले • अंक १ ला • सप्टेंबर २००७ • पृष्ठे ४

## मा.सौ. राजलक्ष्मी भोसले, महापौर, पुणे यांचा संदेश



पुणे महानगरपालिका प्रशासनाने पूर्णपणे मनपा अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी कल्याणवार्ता हे मुखपत्र सुरु करण्याचा निर्णय घेतलेला आहे. हा उपक्रम निश्चितच स्तुत्य आहे. कल्याणवार्ताच्या प्रथम अंकाच्या प्रकाशनानिमित्त हार्दिक शुभेच्छा. कल्याणवार्ताचं स्वरुप हे आगामी काळामध्ये अधिक व्यापक व कर्मचाऱ्यांच्या सर्व गरजा पूर्ण करणारं होवो. तसेच या प्रकाशनाद्वारे मनपारुपी रथाच्या शासन व प्रशासन या दोन चाकांमधील सुसंवाद वृध्दिंगत होवून परिणामी पुणे शहराचा सर्वांगीण विकास व्हावा अशी अपेक्षा आहे. मनपातील जे अधिकारी व कर्मचारी स्वत:चे काम सांभाळून या प्रकाशनासाठी योगदान देत आहेत, त्यांना विशेष धन्यवाद. ते सर्व हे काम मनापासून करीत आहेत. त्यांच्या या विशेष प्रयत्नामुळे महानगरपालिका प्रशासनाची व पर्यायाने मनपाची जनमानसातील प्रतिमा निश्चितच उंचावली जाईल, याची आम्हास खात्री आहे.

## मा.मोहन अडतानी,अति. महा. आयुक्त (ज) यांचा संदेश



कल्याणवार्ताच्या प्रथम प्रकाशनानिमित्त आमच्या हार्दिक शुभेच्छा.

कल्याणवार्ता या मासिकाद्वारे पुणे महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी ज्या कल्याणकारी योजना अंमलात आणल्या जातात, त्यांची यथार्थपणे माहिती कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी परिणामकारक उपयोग होईल, अशी आमची धारणा आहे. कल्याणवार्ता मासिक हे मनपा अंतर्गत प्रकाशन आहे. यामध्ये संपादक, डीटीपी ऑपरेटर, स्टेनो, प्रेसमधील कर्मचारी, इत्यादी सर्व सेवकांचे सांघिक कार्य आहे. या मासिकाद्वारे प्रत्येक सेवकाला स्वत: मधील सुप्त गुणांचा विकास करुन घेण्यास वाव असून, याद्वारे सृजनशीलता वृध्दिंगत होणार आहे. या माध्यमाचा सर्व कर्मचाऱ्यांनी परिणामकारक व यथायोग्य उपयोग करुन घ्यावा आणि त्याद्वारे उपलब्ध मनुष्यबळाचा योग्य व पर्याप्त विकास व वापर व्हावा, हीच अपेक्षा आहे.

## कल्याणवार्ताचे संपादकपदी नियुक्ती

कल्याणवार्ता या कामगारांच्या मुखपत्राचे संपादकपदी मा.नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार) तथा सचिव, कामगार कल्याण निधी आणि कार्यकारी संपादकपदी श्री. लीलाधर वाबळे, कार्यालय अधिक्षक तथा सदस्य, कामगार कल्याण निधी यांची मा. महापालिका आयुक्त यांनी नियुक्ती केली आहे.

## मा. प्रविणसिंह परदेशी, महापालिका आयुक्त,यांचा संदेश



पुणे महानगरपालिकेच्या कामगार विश्वातील घडामोडींची माहिती जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर अधिकारी व सेवकांना करुन देण्याची मागणी होती. प्रशासन आणि अधिकारी/सेवकांमधील सुसंवादासाठी कल्याणवार्ता हे प्रभावी माध्यम राहील. प्रारंभीच्या काळामध्ये याचे स्वरुप छोटेखानी असले तरी बदलत्या परिस्थितीत आवश्यकतेनुसार त्यामध्ये बदल करण्यात येतील. कल्याणवार्ता मासिक पुणे मनपाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न आहे.

या मुखपत्रामध्ये विविध सदरे आहेत. त्याद्वारे कर्मचाऱ्यांपर्यंत मनपाचे विकास प्रकल्प, नवीन उपक्रम व मनुष्यबळ विकासाच्या दृष्टीने आवश्यक असलेली माहिती योग्य पध्दतीने पोहोचविणे, तसेच जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर कामकाज पध्दतीमध्ये सातत्याने होणाऱ्या बदलाची अद्ययावत माहिती अधिकारी / सेवकांना या माध्यमाद्वारे करुन देण्याचा प्रयत्न आहे. त्याद्वारे अद्ययावत कार्यपध्दती व नवीन तंत्रज्ञान आत्मसात करुन उपलब्ध कार्यशक्तीचे रुपांतर कार्यक्षमता व दर्जा वाढीत व्हावे, अशी अपेक्षा आहे. कल्याणवार्ता या मासिकाच्या प्रथम अंकाच्या प्रकाशनानिमित्त संपादक, अधिकारी व सेवकांच्या प्रयत्नातून कल्याणवार्ता भविष्यामध्ये एक आदर्श प्रभावी प्रकाशन व्हावे ही सदिच्छा व हार्दिक शुभेच्छा.

## पुणे मनपामध्ये मनुष्यबळ विकास कक्षाचे कामकाज सुरु

सल्लागार (कामगार) कार्यालयांतर्गत मनुष्यबळ विकास व व्यवस्थापन कक्षाचे काम सुरु करण्यास मा. महापालिका आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. या कक्षाचे प्राथमिक काम सुरु झाले आहे. त्याद्वारे एका विशेष विचारधारेचा छोटाशा प्रवाहाने उगम होत आहे. या कक्षाची कार्यकक्षा खुप विस्तृत आहे. तथापि, निश्चित होणाऱ्या प्राधान्य क्रमानुसार या कक्षाचे काम सुरु करुन, टप्याटप्याने त्या कामाचा विस्तार केला जाईल. या कक्षाच्या कामकाजाच्या संदर्भात लोकप्रतिनिधी, अधिकारी व सेवकांची कल्याणवार्ताच्या माध्यमातून सुसंवाद व संपर्क साधण्यात येणार आहे. तसेच, या विभागाच्या भावी योजना व संकल्पनांची माहिती सेवकांना वेळीच करुन दिली जाणार आहे.

## सेवकांना हृद्य निरोप

मनपा प्रशासनाकडून वर्ग १ ते ४ मधील सर्व सेवकांना एकाच व्यासपीठावर त्यांनी त्यांच्या प्रदीर्घ सेवाकाळामध्ये पुणेकरांना नागरी सुविधाद्वारे दिलेल्या सेवेची दखल घेवून, विशेषत: चतुर्थश्रेणी सेवकांना त्यांच्या सेवापूर्तीप्रित्यर्थ निरोप समारंभ सल्लागार (कामगार) कार्यालयाकडून गेली दोन वर्षे राबविला जात असून तो प्रत्येक महिनाअखेरीस आयोजित केला जातो. यामध्ये मनपा सेवेतून सेवानिवृत्त होणाऱ्या सर्व सेवकांचा समावेश असतो. प्रत्येक सेवकाला शाल, स्मृतिचिन्ह व गुलाबपुष्प प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देवून सन्मानित केले जाते. ऑगस्ट ०७, मध्ये १७ ऐच्छिक व १४ वयपरत्वे असे ३१ निवृत्त झालेले सेवक होते. सदर कार्यक्रम मा. सल्लागार (कामगार)यांच्या अध्यक्षतेखाली व मा. अक्कुर शेठ कुदळे, अध्यक्ष, विधी समिती यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. सूत्रसंचालन श्री. लीलाधर वाबळे तर श्री. जयवंत शिंदे यांनी आभार प्रदर्शन केलं.

## मनपा सदस्य व सेवकांना आवाहन

शासन व प्रशासन यामध्ये सुसंवाद राखून एकजुटीने काम करणेसाठी महानगरपालिकेतर्फे कल्याणवार्ता हे मासिक प्रकाशित होत आहे. या प्रकाशनासाठी मा. सदस्य व सेवकांकडून, त्यांच्या प्रभागात/ खात्यामध्ये राबविण्यात येणारे विविध स्तुत्य उपक्रम, योजना, कार्यक्रम यांचे संक्षिप्तवृत्त, फोटो, इत्यादीसह (शब्द मर्यादा १०० ते १५०) तसेच शासन/ प्रशासन व कर्मचाऱ्यांना उपयुक्त ठरतील अशा सूचना आणि लेख वा अन्य साहित्य (शब्द मर्यादा ४५० ते ५००) पाठवावे. कल्याणवार्तामधून प्रसिध्दी देण्यासाठी त्याचा निश्चित विचार केला जाईल.

## मनन आणि चिंतन

❖ मनाचा संकल्प, बुध्दीचा विचार, शरीराचे कर्म, चित्ताचे अनुसंधान व अहंकाराची निष्ठा हे कर्तव्य गुण आहेत.

❖ मन व बुध्दी यांच्यापाशी अहंकार येतो व सुखाभोवती मन व बुध्दी फिरत असतात.

❖ क्षमता आणि संधी यांच्यातील अंतराला दैव म्हणतात.

❖ पंच ज्ञानेंद्रियांनी पंच महाभुतांशी केलेल्या सुसंवादाला सुख म्हणतात आणि त्यांच्यातील विसंवादाला वेदना म्हणतात.

# इवलेसे रोप लावियेले द्वारी ...

पुणे महानगरपालिकेच्या शासन, प्रशासन आणि अधिकारी, सेवकांच्या अभिव्यक्तीसाठी एक स्वतंत्र व्यासपीठ असावे अशी अनेक वर्षांची सेवकांची मागणी होती. अंमलात आणलेल्या किंवा येणाऱ्या कल्याणकारी योजना, लोकोपयोगी प्रकल्प, यांची सर्वंकष माहिती मनपा अधिकारी/सेवकांना मिळण्यासाठी व त्याचा पूर्ण लाभ संबंधितांना घेता यावा, तसेच अधिकारी/सेवकांनी केलेल्या विधायक संकल्पना वा सूचना, उत्कृष्ट कामाची दखल घेवून त्याला यथोचित प्रसिध्दी देवून, गुणगौरव करुन प्रोत्साहन देण्यासाठी कामगारांचे, कामगारांनी कामगारांसाठी चालविलेल्या मुखपत्राची आवश्यकता होती. अशा प्रकारे दखल घेवून केलेल्या गुणगौरवामुळे अन्य सेवकांच्यापुढे एक ठोस आदर्श ठेवता येणे शक्य होते. या सर्व बाबी कल्याणवार्ताच्या प्रकाशनामुळे नजिकच्या काळात शक्य होणार आहेत. पुणे महानगरपालिकेचे पूर्वी प्रसिध्द होणारे नागरी जीवन, लोकसंवाद इत्यादी मासिक प्रकाशनाद्वारे अधिकारी व सेवकांच्या उत्कृष्ट कामगिरीबाबत प्रसिध्दी जागेअभावी अल्प प्रमाणात दिली जात होती. या सर्व पार्श्वभूमीवर मा. महापालिका आयुक्त यांनी कल्याणवार्ता हे मासिक सुरु करण्यास मान्यता दिलेली आहे. याचा आम्हाला मनस्वी आनंद व अभिमान वाटतो.

संतश्रेष्ठ श्रीज्ञानेश्वर महाराजांनी त्यांच्या प्रसिध्द अभंगात "इवलेसे रोप लावियेले द्वारी, त्याचा वेल गेला गगनावरी" हे जे वर्णन केले आहे त्याची विशेषत्वाने आठवण हे संपादकीय लिहिताना मनामध्ये येत आहे. प्रारंभीच्या काळात या मुखपत्राचे स्वरुप छोटेखानी जरी असले तरी भविष्यामध्ये कल्याणवार्ता हे मासिक चांगल्या व दर्जेदार स्वरुपात सर्वांच्या सक्रीय सहभागाने सेवकांच्या पुढे येईल, याची आम्हांला खात्री आहे.

कल्याणवार्तामध्ये सेवकांच्या साहित्यिक कलागुणांना वाव देणे, सेवकांच्या उत्कृष्ट कर्तुत्वाला प्रसिध्दी देणे, सेवकांची बढती, सेवानिवृत्ती, इत्यादी माहितीस प्रसिध्दी देणे, कामगार कल्याणाच्या योजनांची माहिती यथार्थपणे सेवकांना करुन देणे, कामगार क्षेत्रातील होणाऱ्या बदलांची दखल घेणे, जागतिकीकरणामध्ये महानगरपालिकेच्या कामकाज पध्दतीवर भविष्यात होणाऱ्या बदलांची चाहूल घेवून त्यांची समर्पक माहिती देणे, प्रशासनाकडून सेवकांबाबत वेळोवेळी घेतलेल्या महत्वाच्या निर्णयांना प्रसिध्दी देणे, कामगार कल्याण निधीच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, स्पर्धा, प्रकल्प यांची माहिती देणे, सेवकांशी सुसंवाद साधणेसाठी सेवकांच्या पत्रव्यवहाराला प्रसिध्दी देणे, सेवकांना आवश्यक असलेली माहिती कल्याणवार्ताद्वारे प्रसिध्द करणे, कामगार क्षेत्रातील तज्ञांच्या मुलाखती, लेख प्रसिध्द करणे, मा. महापालिका आयुक्त, मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त आणि मा. खातेप्रमुख व वरिष्ठ अधिकारी यांना ज्या वेळी सेवकांशी संवाद साधणे आवश्यक वाटत असेल त्यावेळी या मुखपत्राचा माध्यम म्हणून उपयोग केला जाणार आहे. कल्याणवार्ताद्वारे काही महिन्यांमध्ये विविध योजना वा नवीन कल्पना प्रत्यक्षात आणण्याचा मानस आहे. याबाबत आपल्याशी आगामी मासिकाच्या आवृत्यांमध्ये निश्चित सुसंवादातून भरीव कार्य करण्याचा संकल्प सोडला जात आहे. या मुखपत्रासाठी सर्व सेवकांचे सक्रीय सहकार्य अपेक्षित आहे आणि तसे ते निश्चितच मिळणार आहे, याची आम्हास खात्री आहे.

## कामगार कल्याण निधी योजनेंतर्गत गुण गौरव व पुरस्कार

**१ मे. कामगार दिन. आयोजित विविध कार्यक्रमा तील विजेत्यांचा व गुणवंतांचा सत्कार–**

पुणे शहरवासियांना उत्तम दर्जाच्या नागरी सुविधा देणे कामी एक मोठी यंत्रणा सतत राबत आहे. या यंत्रणेमध्ये पुणे महानगरपालिकेच्या सर्व स्तरातील सुमारे १७,५०० अधिकारी व कर्मचारी दिवसरात्र कार्यरत आहेत. यामुळेच शहरवासियांना पायाभूत नागरी सुविधा उपलब्ध होत आहेत. कामगार कल्याण निधीच्या विहित उद्देशानुसार महापालिका अधिकारी/सेवकांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी, परस्परांमध्ये सहकार्य व समन्वयाची भावना जागृत करुन त्यांची कार्यक्षमता व गुणवत्ता वाढ करणेकामी सन २००७-०८ या आर्थिक वर्षामध्ये विविध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम व गुणवंत कामगार पुरस्कार, इत्यादी कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. १ मे, कामगार दिन. या दिवसाचे औचित्य साधून, पुणे महानगरपालिकेच्या कामगारांचा, कामगारांनी, कामगारांसाठी, कामगार कल्याण निधी निर्माण केला आहे की, ज्या निधीमध्ये कामगारांच्या सहभागाबरोबर मनपा प्रशासनानेही समप्रमाणात आर्थिक सहयोग दिलेला आहे. या कामगार कल्याण निधीतून विविध स्पर्धा आणि कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. कामगार कल्याण निधीच्या विहित उद्देशाप्रमाणे वरील कार्यक्रमामार्फत कामगारांमध्ये दडलेल्या कलाकारांना, क्रिडापटुंना आपली कला, क्रिडा कौशल्य आणि वैयक्तिक प्रतिभा सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आली. कामगार व अधिकाऱ्यांमध्ये असणाऱ्या सुप्त गुणांना वाव देणे, त्यांच्या गुणांना यथोचित श्रेय देवून त्यांना विविध पुरस्कार देवून प्रोत्साहित करणे आणि त्यांच्या कृतीशील प्रतिमेद्वारे मनपाची जनमानसातील प्रतिमा उंचावणे हे मुलभूत ध्येय या कार्यक्रमामागे आहे.

**कामगार कल्याण निधी**

गुणवंत कामगार पुरस्कार, शैक्षणिक कर्ज शिष्यवृत्ती, मृत्यू वा शारिरीक अपंगत्व आल्यास अशा प्रसंगी तातडीने अर्थसहाय्य, प्रशिक्षण व तदनुषंगिक उपक्रम, क्रिडा, सांस्कृतिक कार्यक्रम व इतर कल्याणकारी योजना, इ.उद्देशाने सन २००५ मध्ये कामगार कल्याण निधी महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेने सुरु करण्यात आला. महापालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली या निधीच्या कामकाजासाठी एक समिती तीन वर्षांसाठी स्थापन करण्यात आली. या समितीमध्ये अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) हे कार्यकारी अध्यक्ष असून, श्रेणी १, २, ३ व ४ चे सेवक, मान्यताप्राप्त कामगार संघटनेचा प्रतिनिधी असे एकूण १२ सदस्य आहेत. खजिनदार व सचिव अनुक्रमे मुख्यलेखापाल व सल्लागार (कामगार) आहेत. महापालिकेतील अधिकारी व सभासदांकडून रु. १०० वार्षिक वर्गणी निधी कपात केली जाते. या संकलित वर्गणीइतका मनपा मालक या नात्याने आपला हिस्सा जमा करते. या सहयोगातून हा कामगार कल्याण निधी निर्माण होतो. निधीच्या विहित निकषानुसार १) मृत्यू प्रसंगी रु.१५०००/- वारस अनुदान २) रु.१२०००/- विना व्याज शैक्षणिक कर्ज शिष्यवृत्ती, ३) रु. ११११३ /-गुणवंत कामगार पुरस्कार याचबरोबर सेवकांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या विविध क्रिडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादीसाठी विनियोग केला जातो. क्रिडा स्पर्धा व विविध सांस्कृतिक कार्यक्रम दरवर्षी कामगार दिनाच्या निमित्ताने घेतले जातात. त्यामधून एक भव्य असा १ मे चा कार्यक्रम उभा राहिला. त्यामध्ये विविध स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रम व नाटकाच्या आधारे कामगारांनी आपल्यातील सुप्त गुण प्रकट केले. सांघिक व वैयक्तिक खेळांचेही आयोजन करण्यात आले होते. त्याद्वारे सेवकांनी आपले नैपुण्य सिद्ध केले.

**क्रिकेट स्पर्धा**

कामगार दिनानिमित्त २३ ते ३० एप्रिल या काळात क्रिडा स्पर्धा घेण्यात आल्या. २३ एप्रिल रोजी क्रिकेट स्पर्धांचे भव्य उद्‍घाटन पं.जवाहरलाल नेहरु येथे मा. बाळासाहेब थोरवे आणि श्री. धीरज जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेसाठी फिरता चषक ठेवण्यात आला आहे. या वर्षी क्रिकेटमध्ये घोलेरोड क्षेत्रिय कार्यालयाने प्रथम तर संगमवाडी क्षेत्रिय कार्यालयाने दुसरा क्रमांक पटकावला.



क्रीडा स्पर्धांचे उदघाटन मा. बाळासाहेब थोरवे यांच्या हस्ते व धिरज जाधव यांच्या उपस्थितीत...

**रांगोळी स्पर्धा**

कामगारांमधल्या कलागुणांना वाव देण्यासाठी २६ एप्रिल, ०७ रोजी रांगोळी स्पर्धांचे व फोटोग्राफीचे प्रदर्शनाचे आयोजन मनपा भवनात करण्यात आले होते. रांगोळी स्पर्धेमध्ये एकूण ६ सेवक सहभागी झाले होते. तसेच, फोटोग्राफीचेही प्रदर्शन भरविण्यात आलं होतं. या प्रदर्शनात सुरेश परदेशी व सुरेंद्र वाळके या सेवकांच्या छायाचित्रांचं प्रदर्शन भरविण्यात आलं होतं. रांगोळी स्पर्धा व फोटोग्राफी प्रदर्शनाचं उदघ्याटन व परीक्षण सुप्रसिध्द शिल्पकार व चित्रकार मा. डी.एस.खटावकर यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी प्रा. श्रीकृष्ण घाटगे, मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) मोहन अडतानी, इत्यादी उपस्थित होते. रांगोळी स्पर्धेत जगदीश चव्हाण, सहाय्यक अभियंता यांनी प्रथम व गीता आचारी यांनी दुसरा क्रमांक पटकावला.

**व्हॉलिबॉल स्पर्धा**

२८ एप्रिल, ०७ रोजी व्हॉलिबॉल स्पर्धांचं आयोजन करण्यात आलं. या स्पर्धेमध्ये १४ संघांनी भाग घेतला होता. या क्रिडा स्पर्धेचं उद्‍घाटन श्री. शेखर सावदेकर व श्री. दत्ता मोरे यांच्या हस्ते करण्यात आलं. या क्रिडा स्पर्धा जनरल अरुणकुमार वैद्य स्टेडीयमवर झाल्या. या स्पर्धेत प्रथम अग्निशामक दलाने तर डॉ. सर्वपल्ली

पान ३ वर...

... पान २ वरुन

## कामगार कल्याण निधी तर्फे गुण गौरव व पुरस्कार

राधाकृष्णन महाविद्यालयाने द्वितीय क्रमांक पटकावला. या खेळाच्या स्पर्धेतही फिरता चषक ठेवला आहे.

**कबड्डी स्पर्धा**

२८ एप्रिल, ०७ रोजी अरुणकुमार वैद्य स्टेडियमवर झालेल्या कबड्डी स्पर्धामध्ये एकूण १४ संघांनी भाग घेतला होता. या क्रिडा स्पर्धेचं उदघाटन पुणे महानगरपालिकेचे सदस्य मा. नाना भानगिरे यांच्या हस्ते झालं. या स्पर्धेत प्रथम क्रमांक सुरक्षा विभागाने तर द्वितीय क्रमांक औंध क्षेत्रिय कार्यालयाने पटकावला. या खेळासाठीही फिरता चषक ठेवला आहे.

**कॅरम स्पर्धा**

पं.नेहरु स्टेडियमवर झालेल्या या क्रिडास्पर्धेत एकूण ६५ सेवक सहभागी झाले होते. या स्पर्धेचं उदघाटन राष्ट्रीय खेळाडू श्री. शैलेंद्र चव्हाण यांच्या हस्ते झालं. या प्रसंगी मा. सुभाष थोरवे उपस्थित होते. या स्पर्धेत विकास सितापकर यांनी पहिला तर दादाराव शिंदे यांनी दुसरा क्रमांक पटकावला.

**बुध्दिबळ स्पर्धा**

नेहरु स्टेडियम येथे झालेल्या बुध्दिबळ स्पर्धेचं उद्घाटन बुध्दिबळपटू महिला ग्रँडमास्टर स्वाती घाटे यांच्या हस्ते झालं. या स्पर्धेमध्ये ४८ स्पर्धकांनी भाग घेतला होता. पुणे महानगरपालिकेचे अंध सेवक बेंद्रे यांच्याबरोबर बुध्दिबळ खेळून स्वाती घाटे यांनी सर्व स्पर्धकांना प्रोत्साहित केलं. या स्पर्धेत महेंद्र जगताप यांनी पहिला तर सदानंद लिटके यांनी दुसरा क्रमांक पटकावला.

**कुस्ती स्पर्धा**

या स्पर्धेमध्ये २० सेवक सहभागी झाले होते. या स्पर्धेचं उद्घाटन ३० एप्रिल रोजी श्री. बाळासाहेब लांडगे आणि श्री. काका पवार यांच्या हस्ते झालं. या प्रसंगी श्री. विलास काथुरे उपस्थित होते. ही स्पर्धा नेहरु स्टेडियममध्ये ७ गटांमध्ये घेण्यात आली. गटनिहाय विजेते ५५ कि. श्री. दिलीप कवितके, ६० कि.विजय जावळकर, ६६ कि. निलेश पांगारकर, ७४ कि.तुकाराम जवळकर, ८४ कि. हणमंत नांगरे, ९६ कि. पेक्षा जास्त शुक्राचार्य वांजळे यांनी विजेतेपद पटकावलं.

**अन्य स्पर्धा**

या स्पर्धांव्यतिरिक्त नागरी सुविधा, अपेक्षा व उपाय या विषयावर वडके हॉल इथं घेतलेल्या निबंध स्पर्धेमध्ये परशुराम चोपडे यांनी पहिला तर कमलेश चौधरी यांनी दुसरा क्रमांक पटकावला. माजी महापालिका सहाय्यक आयुक्त श्री. मनोहर भाटे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिलं.

**टेबल टेनिस स्पर्धा**

माजी टेनिसपटु श्री. सुबोध भावे यांचे हस्ते उद्घाटन करुन टेबल टेनिस स्पर्धा सणस स्पोर्टस् ग्राऊंडवर आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत नंदकुमार जगताप यांनी पहिला तर राजपाठक यांनी दुसरा क्रमांक पटकावला.

**संगीत खुर्ची स्पर्धा**

संगीतखुर्ची स्पर्धा नेहरु स्टेडियम येथे झाली. या स्पर्धेत २५ स्पर्धक सहभागी झाले होते. यामध्ये शैला चव्हाण यांनी पहिला तर अरुणा जाधव यांनी दुसरा क्रमांक पटकावला.

**थ्रो बॉल स्पर्धा**

थ्रो बॉल स्पर्धा नेहरु स्टेडियमवर आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत २५ कर्मचारी सहभागी झाले होते. यामध्ये अरुणा जाधव यांनी पहिला तर सुप्रिया परदेशी यांनी दुसरा क्रमांक पटकावला.

**१०० मिटर धावणे**

१०० मि.धावणे स्पर्धा ४० वर्षांखालील व ४० वर्षांवरील अशा दोन गटात सणस स्पोर्ट्स ग्राउंड येथे घेण्यात आली. ४० वर्षांखालील गटामध्ये १२ स्पर्धकांनी भाग घेतला होता विनोद लांडगे यांनी पहिला तर दुसरा क्रमांक मारुती ढोकळे यांनी पटकावला. ४० वर्षांवरील गटात १५ स्पर्धकांनी भाग घेतला. अविनाश पंढरी आणि दादासाहेब फापाळे यांनी अनुक्रमे पहिला व दुसरा क्रमांक पटकावला. महाराष्ट्र अॅथलेटिक असोसिएशनचे पदाधिकारी श्री. अकोटकर या प्रसंगी प्रमुख पाहुणे व पंच म्हणून उपस्थित होते.

**सांस्कृतिक कार्यक्रम**

याशिवाय पुणे महापालिकेची प्रतिभा आणि जनमानसातील प्रतिमा या विषयावर महाचर्चेचे आयोजन मनपा भवनातील छत्रपती शिवाजी सभागृहामध्ये करण्यात आलं होतं. महाचर्चेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून माजी सांख्यिकी व संगणक प्रमुख श्री.मिलिंद वैशंपायन हे उपस्थित होते. लीलाधर वाबळे यांनी महाचर्चेचं बीजभाषण व सूत्रसंचालन केलं. या चर्चेत नंदकिशोर जगताप, शिवाजी दौंडकर, अरुण खिलारी, तुकाराम जगताप, पांडुरंग सावंत, अरविंद कुबडे, महेंद्र जगताप, रमेश आबादे, विलास शिंदे, प्रकाश हुरकुडली, अरुणा जाधव व अन्य उपस्थितांनी विविध मुद्यांचा परामर्श घेत आपले विचार प्रकट केले.

महापालिकेच्या कर्मचाऱ्यांमधील अनेकजण कलाकारही आहेत. त्यांच्या कलागुणांना वाव देण्याचा प्रयत्न कामगार दिनाच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून झाला. ३० एप्रिल रोजी कर्मचाऱ्यांनी 'प्रेमा तुझा रंग कसा' हे नाटक सादर केलं. या नाटकाचा प्रयोग बालगंधर्व रंगमंदिरात झाला.

या नाटकात ज्यांनी भूमिका केल्या त्या कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी रंगमंचावरील अभिनेत्री अरुणा भट व टेक्सास गायकवाड हे प्रमुख पाहुणे उपस्थित होते. या प्रसंगी अरुणा भट यांनी एड्सवर एक प्रहसन सादर केलं. या नाटकात प्रमुख भूमिका अॅड. मंजुषा इधाटे, जयश्री जाधव, संजय देवळे, रविंद्र घारमळकर, मंगलदास माने, अरविंद कुबडे यांनी केल्या. या नाटकाच्या बॅक स्टेजची जबाबदारी माया महेंद्रे, सारिका मोझे, पिंगळे, शिक्रे, दाते व शेख यांनी समर्थपणे सांभाळली.

**विविध गुणदर्शन: एक गौरव**

महापालिका सेवक व त्यांच्या कुटुंबियांचा सहभाग असलेल्या विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम १ मे, ०७ रोजी सायंकाळी ४.०० वाजता बालगंधर्व रंगमंदिरात संपन्न झाला. या कार्यक्रमात एकूण २५ कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांनी भाग घेतला होता. या कार्यक्रमासाठी स्वरुपकुमार व पुष्कर जोग यांची विशेष उपस्थिती होती. हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी अरविंद कुबडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

या सर्व स्पर्धा व कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये सल्लागार (कामगार) कार्यालयाचा सिंहाचा वाटा होता. सल्लागार (कामगार) तथा सचिव, कामगार कल्याण निधी, नंदकिशोर जगताप यांच्या नेतृत्वाखाली शिवाजी दौंडकर व अरुण खिलारी हे दोन कामगार कल्याण अधिकारी तसेच अशोक ढगे, किशोर रायचूरकर, जयवंत शिंदे, सुदाम साळुंके, सुरेश ढाणक, प्रशांत गुंजाळ, गोकुळदास कांबळे, सखाराम बुरसे, ज्योती घरवाढवे, अलका तनपुरे या सेवकांच्या मोलाच्या सहभागामुळे वरील सर्व कार्यक्रम यशस्वी होवू शकले.

तसेच, क्रिडा स्पर्धांचे समन्वयक म्हणून प्रदीप महाडिक, गणेश मांजरे, इसाक शेख, लक्ष्मीकांत शिंदे, नंदकुमार जगताप, अविनाश पंढरी, दत्तात्रय भंडारी, जगदीश चव्हाण, सुरेश परदेशी, लीलाधर वाबळे, अरविंद कुबडे, निलेश चव्हाण, जितेंद्र बागे, सुरेंद्र वाळके, सारीका मोझे, माया महेंद्रे, सय्यद, सुप्रिया परदेशी यांनी स्वत:चे कार्यालयीन काम सांभाळून मनापासून सहकार्य व मदत केली. या कार्यक्रमांतर्गत क्रिडा स्पर्धासाठी नेहरु स्टेडियमचे व्यवस्थापक सुभाष पुरी तसेच भवानीपेठ क्षेत्रिय कार्यालयाचे क्षेत्रिय अधिकारी सुनिल गायकवाड, मनपा प्रेसचे व्यवस्थापक जयंत पवार यांनी मोलाचं सहकार्य केलं. याशिवाय भवन/विद्युत विभाग, पंडीत नेहरु व वैद्य स्टेडियम, सणस स्पोर्टस् ग्राउंड, बालगंधर्व रंगमंदिर येथील अधिकारी व सेवकांनी सर्व कार्यक्रमात मदत व सहकार्य केलं. क्रिडा स्पर्धांच्या आयोजनात डी.जी.कॉपिअर्स, विजय मुद्रणालय, स्नेहा स्टुडिओ व फोटोग्राफी यांनी विशेष सहकार्य केलं.

**गुणी कर्मचाऱ्यांना पुरस्कार**

कामगार कल्याण विहित नियमावलीनुसार सन २००७ या वर्षासाठी वर्ग १ ते ४ साठी अनुक्रमे १, १, ५, १३ असे एकूण २० गुणवंत कामगारांना पुरस्कार देण्याचं निश्चित करण्यात आलं आहे. विहित निकष व कार्यपध्दतीनुसार कार्यालयीन परिपत्रकाद्वारे संबंधितांकडून अर्ज मागविण्यात आले. एकूण ३९ सेवकांचे अर्ज प्राप्त झाले. सल्लागार (कामगार) तथा सचिव, कामगार कल्याण निधी नंदकिशोर जगताप यांच्या अध्यक्षतेखाली उपायुक्त मोळक, मनपा कामगार युनियनच्या सरचिटणीस मुक्ता मनोहर, केंद्रीय कामगार शिक्षण मंडळाचे विभागीय संचालक डॉ. पी.पी.जोशी या सदस्यांची निवड समिती नियुक्ती करण्यात आली होती. या निवड समितीने १३ सेवकांची गुणवंत पुरस्कारासाठी निवड केली.

**निवड झालेले गुणवंत कर्मचारी खालीलप्रमाणे**

१.दिनेश गिरोल्ला, कनिष्ठ अभियंता,दक्षता.२.पंडित कोहकडे, अन्न निरीक्षक, आरोग्य.३.गिरीश बहिरट, ज्युनियर ग्रेड लेखनिक, बांधकाम विभाग. ४.दीपक पाथरकर, मिटर रिडर, पाणीपुरवठा. ५. श्रीकृष्ण घरडे, चॅम्पियन मशिन ऑपरेटर, घोलेरोड.६.उत्तम बनसुडे, बिगारी,मलनि:सारण. ७.वैजिनाथ गायकवाड, कचरा मोटार बिगारी, कर्वेरोड क्षे.का. ८. अशोक कांबळे, झाडुवाला, महात्मा फुले मंडई.



मा. डॉ.नरेंद्र जाधव, कुलगुरु, पुणे विद्यापीठ यांच्या हस्ते गुणवंत पुरस्कार स्विकारताना उत्तम बनसुडे याप्रसंगी डावीकडून मा.प्रा. विकास मठकरी, डॉ. जाधव, मा. अनंत दिक्षीत, मा. मोहन अडतानी, मा. नंदकिशोर जगताप

९. सदाशिव भिसे, कचरा मोटार बिगारी, आरोग्य. १०. चंद्रकांत गमरे, झाडुवाला, सहकारनगर क्षे.का. ११. सचिन कदम, बिगारी, मलनि:सारण. १२. राजू खरात, बिगारी, कर्वेरोड क्षे.का. १३. धर्मानंद जगताप, शिपाई, आयातकर कार्यालय अशा १३ सेवकांची गुणवंत कामगार म्हणून निवड करण्यात आली. या सर्वांचा सत्कार १ मे ०७ रोजी बालगंधर्व रंगमंदिर येथे मा. नरेंद्र जाधव, कुलगुरु, पुणे विद्यापीठ, मा. अनंत दीक्षित, संपादक, लोकमत, पुणे, मा. विकास मठकरी, विरोधी पक्ष नेते, पुणे मनपा यांच्या हस्ते रक्कम रु.११,१११, स्मृतीचिन्ह, शाल, पुष्पगुच्छ देवून करण्यात आला.

**विशेष कामगिरी पुरस्कार**

पुणे महानगरपालिकेच्या सेवेत विशेष कामगिरी केलेल्या खालील सेवकांचा या कार्यक्रमात यथोचित सत्कार करण्यात आला.

पुणे मनपाच्या इमारतीतील लिफ्टचा दरवाजा संपूर्ण बंद करण्यापूर्वी अचानक निर्माण झालेल्या तांत्रिक बिघाडामुळे लिफ्ट सुरु झाली. त्या वेळी ड्युटी वरील लिफ्टमन सोपान शंकर कुंजीर यांनी प्रसंगावधान राखून दुसऱ्या मजल्यावरील बाहेरील दरवाजा उघडला. लिफ्टमधून बाहेर उडी मारुन धावत जावून मेन स्विच बंद केला आणि लिफ्टमधील ९ नागरिकांचा जीव वाचवून त्यांची सुटका केली.

अग्निशामक दलातील दिलीप सखाराम बिबवे यांनी अमीर हॉटेल

पान ४ वर...

# गुणवंत कामगार पुरस्कार प्राप्त कर्मचारी



**दिनेश गिरोल्ला**
कनिष्ठ अभियंता, दक्षता



**पंडित कोहकडे**
अन्न निरीक्षक, आरोग्य



**गिरीश बहिरट**
कनिष्ठ लिपीक, बांधकाम



**दीपक पाथरकर**
मीटर रीडर, पाणीपुरवठा



**श्रीकृष्ण घरडे**
चँ. मशीन ऑपरेटर घोले रोड



**उत्तम बनसुडे**
बिगारी, मलनिःसारण



**वैजिनाथ गायकवाड**
कचरा मोटार बिगारी, कर्वे रोड



**अशोक कांबळे**
झाडुवाला, फुले मंडई



**सदाशिव भिसे**
कचरा मोटार बिगारी, आरोग्य



**चंद्रकांत गमरे**
झाडुवाला, सहकारनगर



**सचिन कदम**
बिगारी, मलनिःसारण



**राजू खरात**
बिगारी, कर्वेरोड



**धर्मानंद जगताप**
शिपाई, आयातकर

... पान ३ वरुन

## कामगार कल्याण निधी तर्फे गुण गौरव व पुरस्कार

समोरील ड्रेनेजमध्ये उतरलेल्या व बेशुध्द झालेल्या कामगाराला सुखरुप बाहेर काढले. देवकुळे महादेव लोकिबा, तांडेल यांनी जुलै २००६ मध्ये शहरात झालेल्या अति-पर्जन्यवृष्टीत विठ्ठलनगर हिंगणे खुर्द येथील सोसायट्यांमध्ये पुराच्या पाण्यात अडकलेल्या नागरिकांची सुटका करुन त्यांना सुरक्षित स्थळी हलवले.

श्रीराम गोपाळ खेडेकर,फायर इंजिन ड्रायव्हर यांनी मंगळवारपेठ येथील ६ ट्रान्स्पोर्ट कंपनीच्या गोदामाला भीषण आग लागली होती. त्या गोदामामध्ये काडतुसांचा साठा होता. यावेळी ड्रायव्हर म्हणून जबाबदारी पार पाडत असताना जीव धोक्यात घालून आग विझवण्याची मोलाची कामगिरी केली.

सुरेश बाबुराव सागवेकर, सहाय्यक विभागीय अधिकारी, सिताराम तान्हु खाके, तांडेल, चंद्रकांत नारायण आनंददास, फायरमन, राजेश श्रीधर कुलकर्णी, फायरमन व संतोष आबाजी सुर्वे या पाच अग्निशामक दलातील सेवकांनी कदम वाक वस्ती, लोणीकाळभोर येथे कवडीपाट टोलनाक्यानजीकच्या अडीच फुट रुंदीच्या विंधन विहिरीमध्ये कु. श्वेता हनुमंत शेंडगे ही अडीच वर्षांची बालिका २० फुट खोल आत पडली होती. या अत्यंत कठीण कामासाठी अग्निशामक दलाकडे कोणत्याही प्रकारची अत्याधुनिक साधने उपलब्ध नसताना केवळ लोखंडी सळईच्या सहाय्याने सदर बालिकेस बाहेर काढून तिचे प्राण वाचवले.

या विशेष व उल्लेखनीय कामगिरी केलेल्या सेवकांच्या कार्याची १ मे चे कार्यक्रमात कामगार कल्याण निधीतर्फे विशेष दखल घेवून सत्कार करण्यात आला.

मा. सुरेंद्र मुदलियार यांनी मनोगतात मनपा सेवकांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेणे व प्रोत्साहन देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन केले. त्यासाठी निधीला रु. १०,०००/- ची देणगी देवून सक्रीय सहकार्य केले आहे. या देणगीतून **''सरदार मुदलियार कार्यप्रेरणा पुरस्कार''** या वर्षी महापालिकेचे मा. सह महापालिका आयुक्त (जिं.घ.) अरुण पाटील यांना प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नरेंद्र जाधव, लोकमतचे संपादक मा. अनंत दिक्षीत प्रमुख पाहुणे होते. या प्रसंगी महापालिकेचे विरोधीपक्ष नेते मा. प्रा. विकास मठकरी, मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) मोहन अडतानी यांची विशेष उपस्थिती होती. मा. महापौर सौ. राजलक्ष्मी भोसले यांच्या नवकल्पनेनुसार या वर्षीपासून पाहुण्यांना प्रसिध्द आणि गाजलेली पुस्तकं भेट म्हणून देण्याचा पायंडा महापालिकेने पाडला आहे. त्यानुसार व्यासपीठावरील मान्यवरांना चांगली पुस्तकं भेट म्हणून देण्यात आली. या पुस्तकांमध्ये डॉ. नरेंद्र जाधव यांचं आमचा बाप आणि आम्ही, डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जीवनावर व.न.इंगळे यांचं झेप अवकाशी अग्निपक्षाची, मा. शिवाजीराव भोसले यांचं दीपस्तंभ व मुक्तीगाथा महामानवाची आणि आम्ही शास्त्रज्ञ या निवडक पुस्तकांचा समावेश होता.

या प्रसंगी कुलगुरु डॉ. नरेंद्र जाधव यांनी, दारिद्र्याचे उद्दात्तीकरण करण्याची मानसिकता बदलण्याची गरज असून, आर्थिक दारिद्र्यापेक्षाही मानसिक दारिद्र्य जास्त वाईट आहे. प्रत्यक्षात गरीबी तर वाईट असतेच पण त्या गरीबीतून येणारे मानसिक दारिद्र्य जास्त वाईट असते. कामगारांनी या मानसिकतेतून बाहेर पडण्यासाठी स्वत:ची गुणवत्ता व क्षमता सुधारण्यासाठी प्रयत्न करणं आवश्यक आहे. **कोणतेही काम करताना ते कसं आहे, त्यापेक्षा आपण ते कसं करतो हे महत्वाचं आहे,** असे बहुमोल मार्गदर्शन मनपा सेवकांना केले.

मा. अनंत दीक्षित यांनी कष्टकऱ्यांच्या कष्टावरच जगाचा गाडा चालतो, समाजाचं वैभव केवळ बुद्धितून येत नाही. तर त्यामागे सामान्य माणसाचे, कामगारांचे कष्ट असतात. त्यातूनच जगाची प्रगती होत असते, तसेच **''ड्रेनेजमध्ये चार दिवस सडलेली डुकरं काढण्याचे काम व मोठ्या कॉर्पोरेट कंपनीच्या वातानुकुलित कार्यालयात बसून करण्याचे काम सारख्या दर्जाची आहेत''**, असे विचार मांडले.

विरोधी पक्षनेते प्रा. विकास मठकरी यांनी कामगार दिनाचं महत्व मोजक्या शब्दात व्यक्त करताना या उत्तम योजनेसाठी निधी अत्यंत कमी असून, सेवक व मनपा प्रशासनाच्या उदार व सक्रीय सहभागातून निधीत भरघोस वाढ करावी, असे सूचित केले. कामगारनेत्या मुक्ता मनोहर यांनीही या प्रसंगी आपलं मनोगत व्यक्त केलं.

नंदकिशोर जगताप यांनी प्रास्ताविकात कामगार कल्याण निधीच्या कार्याचा वार्षिक आढावा घेताना **''आपण उगम पावलो आहोत. याचे रुपांतर महासागरात आपल्या सहकार्याने निश्चित करणे आहे,''** असे प्रतिपादन केलं. मा. मोहन अडतानी, अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) तथा कार्याध्यक्ष, कामगार कल्याण निधी यांनी, **''ज्या सेवकांना बक्षिसे मिळाली नाहीत, त्यांनी नाउमेद होवू नये, तर अधिक जोमाने व तयारीने पुढील वर्षीच्या स्पर्धांसाठी सज्ज रहावे,''** असे विचार व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे संयुक्त सूत्रसंचालन कामगार कल्याण अधिकारी शिवाजी दौंडकर व कार्यालय अधिक्षक तथा सदस्य कार्यकारी समिती, कामगार कल्याण निधी लीलाधर वाबळे यांनी केलं. कामगार कल्याण अधिकारी अरुण खिलारी यांनी आभार मानले व कार्यक्रम संपन्न झाला.


**कल्याणवार्ता**
**मनपा कर्मचाऱ्यांचे मुखपत्र**
**सप्टेंबर, २००७**
**❖ प्रकाशक तथा अध्यक्ष ❖**
**कामगार कल्याण निधी**
**मा. प्रविणसिंह परदेशी**
आयुक्त, पुणे महापालिका
**❖ संपादक ❖**
मा. नंदकिशोर जगताप
सल्लागार (कामगार)
**❖ कार्यकारी संपादक ❖**
लीलाधर प्र.वाबळे
कार्यालय अधिक्षक
**❖ सहाय्यक ❖**
सौ. ज्योती घरवाढवे
**❖ मुद्रक ❖**
मुद्रणमहर्षि मामाराव दाते
मुद्रणालय, मनपा, पुणे.
**❖ प्रकाशन स्थळ ❖**
पुणे महापालिका
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५



या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी प्रकाशक, संपादक, कार्यकारी संपादक व पुणे महापालिका सहमत असतीलच असे नाही.



**❖ संपर्क ❖**
सल्लागार (कामगार) कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
दूरध्वनी क्र. २५५० १२५५/ १२५२/१२५३



**फक्त खाजगी वितरणासाठी**
(विनामूल्य)